# राजर्षी छत्रपती शाहूमहाराज: शिक्षण आणि शैक्षणिक सुधारणाविषयी दृष्टिकोन

**डॉ. मिनाक्षी गंगाधर मिणचे** ईमेल- kumarkmate6@gmail.com

---

- **प्रस्तावना:**

ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राची जडणघडण करण्यात ज्या थोर पुरुषांनी मोठा वाटा उचलला, त्यापैकी छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे एक होते. राजर्षी शाहू महाराज हे प्रगतशील विचारवंत होते. पुरुषप्रधान समाजात रूढी, प्रथा ,परंपरा आणि अंधश्रद्धांचा पगडा असल्यामुळे स्त्रियांवर समाजातील उपेक्षित घटकांवर सतत अन्याय होत होते. या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जाती धर्मीयाच्या शिक्षणाला, स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. राजर्षी शाहू महाराजांच्या एकंदरीत कार्याचा आढावा घेता समाजातील उपेक्षित घटकाला प्राधान्यक्रम देण्याबरोबरच त्यांच्यात राजकीय सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक विकास घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले

सामाजिक समतेच्या तत्त्वाचे पुरस्कर्ते आणि कृतीशील राजे म्हणून राजर्षी शाहू महाराजांच्याकडे पाहिले जाते त्यांची कारकीर्द म्हणजे न्याय आणि तत्वनिष्ठुरतेची समतावादी कारकीर्द होय.” विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा कार्यप्रवण राजा समाज हितासाठीच कार्यरत होता शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग वंचित अशा समाजाला शिक्षण देऊन त्यांच्यात जाणीव, जागृती निर्माण केली. 19 व्या शतकातील बहुजन समाज हाअज्ञान व दारिद्र्याच्या अंधारात होता. हे सर्व शिक्षणाच्या अभावामुळेचघडले होते. बहुजन समाजात फक्त हाताच्या बोटावर मोजण्या इतपत लोक मॅट्रिक पास होते. खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या. शिक्षणाची मक्तेदारी फक्त उच्चवर्णीय धनिक व जमीनदारी यांच्यापूर्तीच मयादित होती. गरीब दलित व स्त्रिया यांच्या करिता शिक्षणाचे दरवाजे बंद होते. शिक्षण ही ब्राह्मण, श्रीमंत,व सावकार यांच्यासाठीच आहे, अशी धरणा त्यावेळी समाजात निर्माण झाली होती.

शाहू महाराज प्राथमिक शिक्षणाबाबत म्हणतात की शिक्षण हाच तरुणोपाय आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो.” अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उन्नत व लढवये वीर कधीच निपजणार नाहीत, म्हणून सक्तीच्या मोफत व प्राथमिक शिक्षणाची समाजाला गरज आहे असे त्यांचे मत होते “म्हणून त्यांचे शिक्षणासंबंधीचे कार्य त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात केलेल्या कायद्यावरून व त्यांनी राबवलेल्या धोरणावरून आपल्या लक्षात येते.

- **उद्दिष्टे:**

१. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची शिक्षण विषयक विचारसरणी जाणून घेणे.
२. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा शैक्षणिक सुधारणावादी दृष्टिकोन समजावून घेणे.

- **गृहीतके:**

१. समाजाच्या उन्नती करिता प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असले पाहिजे असे शिक्षणाविषयीचे मत छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी व्यक्त केले.
२. व्यक्ती व समाजाच्या आर्थिक राजकीय व सामाजिक उन्नती करिता शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही असा शैक्षणिक सुधारणावादी दृष्टिकोन राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी मांडला.

- **अभ्यासपद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रकाशित अप्रकाशित साहित्य, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे व संकेतस्थळे इत्यादी साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

- **राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य:**

**स्त्री शिक्षण विषयक कार्य:** कोल्हापूर संस्थानाचा स्त्रीशिक्षण विषयीचा दृष्टिकोन मुळातच पूरोगामी होता. मुलींनी शाळेत यावे मुलींनी मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे,यासाठी खास उत्तेजन दिले जात होते. "प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घातल्याचे दिसून येते. खास करून मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी 1919 मध्ये एक खास हुकूम गॅझेट केला होता. त्या अन्वये अशा स्त्रियांच्या राहाण्या जेवन्याच्या सर्व सोयी दरबारा कडून मोफत केल्या जात होत्या. हुशार मुलींना पुढील शिक्षणात प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबारने खास शिष्यवृत्ती ठेवल्या होत्या. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी अत्यंत उदार दृष्टि ठेवली होती "राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी मोफत शिक्षणाची सोय केली होती. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत ही शाहू महाराजांनी अत्यंत उदारदृष्टिकोन ठेवला. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी मोफत शिक्षण दिले. स्त्री

शिक्षणाचा प्रसार स्त्री शिक्षिका असतील तर अधिक वेगाने होऊ शकतो, म्हणून स्त्रियांमधून शिक्षिका तयार करण्यात गरजेचे आहे.या भूमिकेतूनच शाहूंनी 1898 मध्ये स्त्रियांसाठी "अध्यापक महाविद्यालयाची स्थापना "केली,आणि स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाच्या समान संधीची आवश्यकता असल्याचे आग्रही मत व्यक्त केले .एकूणच शाहूंच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर 0.10% वरून 0.35% इतका झाला होता.

**प्राथमिक शिक्षण विषयक कार्य:** सर्वांच्या विकासासाठी शिक्षण यावर शाहू महाराजांचा भर दिसून येतो .कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याविषयीचा विचार इ.स.सन 1912 - 13 च्या सुमारास सुरू होता.जोपर्यंत बहुजन समाज साक्षर होणार नाही ,तोपर्यंत लोकशाहीला डोळसपणा येणार नाही असे त्यांचे मत होते म्हणूनच निरक्षर लोक आपल्यापर्यंत नाही.तर आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी खेडेगाव घटक म्हणून प्राथमिक शिक्षण प्रसारास सुरुवात केली त्यांनी 24 जुलै 1917 साली एक हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.या हुकूमाप्रमाणे 15 ऑगस्ट 1917 साली ग्रामीण भागाची पाहणी करून अहवाल देण्याचा आदेश काढला होता.

**माध्यमिक शिक्षण विषयक कार्य:** कोल्हापूर संस्थानात 1867 मध्ये पहिली इंग्रजी पूर्व प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली होती.ती कोल्हापूर हायस्कूल या नावाने ओळखली जात असे .पुढे ती राजाराम हायस्कूल या नावाने ओळखली जाऊ लागली .या शाळेत मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण दिले जात असे.परंतु पैशाच्या अडचणीमुळे तेथे विद्यार्थी संख्या रोडावली हे जाणून शाहूंनी मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण मोफत केले होते.

**उच्च शिक्षण विषयक कार्य:** उच्च शिक्षणाचा रीतसर प्रारंभ राजाराम महाविद्यालयाच्या स्थापनेपासून झाला, तसेच संस्कृत विषय शिकवण्यासाठी संस्कृत महाविद्यालय सुरू करण्यात आले होते.महाराजांनी बहुजन मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. शेतीला प्राधान्य म्हणून शेतीविषयक अभ्यासक्रमाची सुरुवात केली होती.त्यांच्या प्रयत्नवादी धोरणामुळेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.

**तंत्र शिक्षण विषयक कार्य:** समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी औद्योगिक तांत्रिक व्यावसायिक शिक्षणावर त्यांनी भर दिला होता .त्यासाठी त्यांनी1912 साली जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूशनची स्थापना केली .तसेच अनेक व्यवसायिक शाळा सुरू केल्या होत्या.

**गाव कामगार पाटील स्कूल:** सरकारी कामाचे ज्ञान देणे या उद्देशाने गाव कामगार पाटील स्कूल ची स्थापना कोल्हापूर संस्थानाच्या छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी सर्वात प्रथम केली.

**तपोवन आश्रम व विद्यापीठ:** संस्थानातील प्रत्येक व्यक्ती चरित्र संपन्न नागरिक बनली पाहिजे व ती देशाच्या हिताच्या दृष्टिकोनातून तिचे विचार घडले पाहिजेत याच हेतूने तपोवन आश्रम व विद्यापीठ स्कूलची स्थापना छत्रपती शाहू महाराजांनी केली.

**तलाठी स्कूल:** गाव चावडीतील काम,कामाचे स्वरूप लोकांना समजावे गावातील लोकांची सोय व्हावी, यासाठी तलाठी स्कूलची स्थापना देखील प्रामुख्याने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केलेली दिसून येते तर वैदिक शिक्षण देण्याच्या हेतूने छत्रपती शाहू महाराजांनी श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक स्कूल ही स्थापन केले.

**वसतीगृहांची योजना:** शाहू महाराजांनी 1896 मध्ये कोल्हापूर संस्थानात सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीवसतिगृहे सुरू केली. यामध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग 1901, दिगंबर जैन बोर्डींग 1901, वीरशेव लिंगायत वसतीगृह 1906,मुस्लिम बोर्डिंग 1906,मिस क्लार्क होस्टेल 1908,दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग 1908, नामदेव बोर्डिंग 1911, पांचाळ ब्राह्मण वस्तीगृह 1912,श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह 1915,इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल 1915, रावबहादुर सबनीस प्रभू बोर्डींग 1915,आर्य समाज गुरुकुल 1918,वैश बोर्डिंग 1918 ,ढोर-चांभार बोर्डींग 1919, शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह 1920, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस 1920, सुतार बोर्डिंग 1921 ,नाभिक विद्यार्थी वसतिगृह 1921, सोमवंशी आर्य क्षत्रिय बोर्डिंग1920 श्री. देवांग कोष्टी बोर्डिंग 1921 अशा रीतीने अनेक जातींच्या विकासासाठी वसतिगृहांची सोय उपलब्ध करून दिली. म्हणून राजर्षी शाहू महाराजांना भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचे आद्य जनक म्हणून ओळखले जाते.

**शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना:** दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचितघटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्याचबरोबर तलाठी,शेतकरी ,तांत्रिक शिक्षण संस्था यामध्ये मागास जाती जमातीच्या मुलांना शिष्यवृत्ती योजना सुरू केली. महाराजांनी त्या काळामध्ये शिष्यवृत्ती विषय शिक्षणाची गरज ओळखली होती व त्याच दिशेने कार्य देखील केली आहे.

**व्यवसाय भिमुख शिक्षण:** व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे, म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळा व्यतिरिक्त व्यवसायभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या. त्यामध्ये टेक्निकल स्कूल, राधाकृष्ण मंदिरात

छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर, कलागृह औद्योगिक स्कूलची स्थापना दिल्ली दरबार पाटील शाळा, सत्यशोधक शाळा आणि तलाठी स्कूलची स्थापना अशा वेगवेगळ्या व्यवसायभिमुख शाळांची स्थापना महाराजांनी केलेली दिसते

**कलाशिक्षण:** शाहू महाराजांनी कलांना आणि कलावंत यांना प्रोत्साहन दिले होते.संगीत कलेच्या शिक्षणासाठी त्यांनी 1913 मध्ये देवल क्लबचा आरंभ केला होता.त्यांनी शाहीर, मल्ल, कलावंत यांना आश्रय दिला होता.महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहिरीला उत्तेजन दिले.अनेक शाहिरांना सहाय्य केले यावरून त्यांच्या रसिक मनाची साक्ष पटते. शाहीर, सत्यशोधक जलसेवाले नी कवी या सर्वना त्यानी सहाय्य केले .त्यामुळे त्यांच्या कलेचा विकास झाला आणि शैक्षणिक दृष्ट्या बहुजन समाज प्रगतीपथावर आला.

**क्रीडा शिक्षण:** शाहूमहाराजांनी गावोगावी तालमी, आखाडे स्थापन करण्यास मदत केली, जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, दाडपट्टा, इत्यादीचे शिक्षण तालमीत सुरू झाले. मल्लविद्येबरोबरच शस्त्र विद्येतही गावोगावचे तरुण पारंगत होऊ लागले. स्पर्धे शिवाय प्रगती नाही हे त्यांनी जाणले होते. मल्लांच्या लढती वारंवार करावयाच्या ठरवून जत्रा-उत्सवाच्या व अन्य मंगलप्रसंगी कुस्त्यांचा शौक वाडीस लावला.

- **सारांश:** शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग वंचित अशा समाजाला शिक्षण देऊन त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण केली. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो अज्ञानात बुडून गेलेल्या देशाला उन्नत्व लढवये वीर कधीच निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची भारताला आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. खास मुलींच्या साठी ही स्वतंत्र शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषतः मुलींनी शाळेत यावे. मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे.त्यासाठी खास उत्तेजन दिले जात होते. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत ही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घातल्याचे दिसून येते. खास करून मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी 1919 मध्ये एक खास हुकूम गॅझेट केला होता एकूणच शाहूंच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर 0.10 टक्क्यावरून 0.35 टक्के इतका झाला होता त्यांनी 24 जुलै 1917 साली एक हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करून मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण मोफत केले होते. राजाराम व संस्कृत महाविद्यालय सुरू करून महाराजांनी बहुजन मुलांना अशी उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. त्यांनी 1912 साली जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना करून तांत्रिक शिक्षणाची सुरुवात केलेली दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह स्थापन करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिलेले आहे. तसेच वेगवेगळ्या शाळांची स्थापना केलेली दिसते तसेच दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्याचबरोबर तलाठी,शेतकरी,तांत्रिक शिक्षण संस्था,यांमध्ये मागासजातीच्या मुलांना शिष्यवृत्ती योजना सुरू केली होती. तसेच व्यवसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या होत्या. तसेच महाराजांनी संगीतकलेच्या शिक्षणासाठी त्यांनी 1913 मध्ये देवल क्लबचा आरंभ केला होता. त्यांनी शाहीर ,मल्ल, कलावंत यांना आश्रय दिला होता, महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहिरीला उत्तेजन दिले. अनेक शाहिरांना सहाय्य केले .तसेच शाहू महाराजांनी गावोगावी तालमी,आखाडे स्थापन करण्यास मदत केली. जोर, बैठक, मल्लखांब, कुस्ती दाडंपट्टा, फरीगदगा, बरची भाला, विटा, बाणा, जांभीया इत्यादीचे शिक्षण तालमीत सुरू केले होते.

- **संदर्भसूची:**

1. घोरमोडे के. यु.(2006), शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य,विद्या प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र. 17
2. बैनवाड रमेश कदम एस.के. (2012)राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता, करपे आर.एन.(संपा) शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद. पृष्ठ क्रमांक 68
3. कित्ता पृष्ठ क्रमांक 69
4. डोईफोडे ज्योती (2005)मूलभूत सामाजिक विचार, विद्या बुक पब्लिकेशन्स, औरंगाबाद पृष्ठ क्र. 265
5. कित्ता पृष्ठ क्रमांक,223
6. ठोसर संगीता, कुलकर्णी, दिपाली (2012) राजर्षी शाहू आणि स्त्री प्रश्न: अब्राह्मणी पर्यायाच्या दिशेने, करपे आर.एन. (संपा.)राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद पृष्ठ क्र.155
7. घोरमोडे यु.के. घोरमोडे कला (2006),शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्या प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. 25-26
8. केशव हरेल राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राजकीय विचार पृष्ठ क्र. 38 ते 40